साप्ताहिक
# तेरणा वृत्तांत

धाराशिव | अंक – ३९ | सोमवार, ८ जुन २०२६ | RNI NO. MHMAR/25/A0338 | वर्ष – १ | पाने ४ | किंमत ५ रुपये

## मोदी सरकारच्या १२ वर्षांनिमित्त ‘प्रत्येक बूथवर २१ वृक्षांची लागवड’

### तेर येथून ‘विश्वास, विकास व जनकल्याण’ अभियानाचा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते शुभारंभ

**धाराशिव : शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची यशस्वी १२ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल तसेच जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रात प्रत्येक बुथवर २१ वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. शनिवारी (दि. ६ जून) तेर येथून आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते विश्वास, विकास व जनकल्याण’ अभियानाचा जिल्ह्यात शुभारंभ करण्यात आला आहे.**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखालील एनडीए सरकारला ७ जून रोजी ऐतिहासिक १२ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने भाजप राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात ५ जून ते २१ जून २०२६ या कालावधीत 'म ोदी सरकारची १२ वर्षे: विश्वास, विकास व जनकल्याण' अभियान राबवले जात आहे. याच अभियानाचा भाग म्हणून, तसेच जागतिक पर्यावरण दिन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून भाजपच्या वतीने देशव्यापी वृक्ष लागवड कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत, तेर येथील बूथ स्तरावर आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते शनिवारी शिवराज्याभिषेकादिनी ६ जून रोजी जाहीर वृक्षारोपण करण्यात आले आहे.

भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय व प्रदेश समितीच्या आदेशानुसार, या अभियानाची सुरुवात पर्यावरण रक्षणाने होत आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक मतदान केंद्रावर (बूथवर) किमान २१ वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तेर येथील कार्यक्रमापासून धाराशिव जिल्ह्यातील या मोहिमेला प्रारंभ करण्यात आला आहे. या अभियानांतर्गत केवळ वृक्षारोपणच नव्हे, तर पुढील काही आठवड्यांत विविध लोककल्याणकारी कार्यक्रमही.राबवले जाणार आहेत. ८ ते १४ जून या कालावधीत मतदारसंघातील ५०० प्रतिष्ठित व्यक्तींची भेट घेणे, तसेच प्रत्येक प्रभागात आणि ग्रामीण भागात 'प्रगती पथ यात्रा' काढली जाणार आहे. २१ ते ३० जून या कालावधीत प्रत्येक तालुका पातळीवर आयुष्मान भारत, पीएम आवास, लखपती दीदी यांसारख्या योजनांसाठी नोंदणी शिबिरे आयोजित केली जातील.

### सुजाण नागरिकांनीही सहभागी व्हावे : आमदार राणाजगजितसिंह पाटील

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार देशातील गरीब, शोषित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी कटिबद्ध आहे. हे अभियान यशस्वी करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. जिल्ह्यातील सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, आघाडीचे कार्यकर्ते आणि सुजाण नागरिकांनी आपापल्या बूथ स्तरावर सक्रिय सहभाग नोंदवून वृक्षारोपणाचा हा संकल्प यशस्वी करावा, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

## दुर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात संपन्न

**रायगड : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा अभूतपूर्व उत्साहात संपन्न झाला. यावेळी राज्यभरातून आलेल्या हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत रायगड परिसर भगवामय झाला होता.**

या सोहळ्याच्या निमित्ताने पारंपरिक वेशभूषा, ढोल–ताशांचा गजर, जय शिवरायच्या घोषणांनी रायगडाचा परिसर दुमदुमून गेला. यावेळी उपस्थित शिवभक्तांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करत स्वराज्याच्या विचारांप्रती आपली निष्ठा व्यक्त केली.

सोहळ्यादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मावळ्यांच्या शौर्याचे दर्शन घडविणारे तसेच शिवचरित्रावर आधारित सादरीकरण करण्यात आले. राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने रायगडावर दिवसभर उत्साहाचे आणि भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले.





## विधानपरिषदेची लढत स्पष्ट १८ जूनला मतदान, २२ जूनला मतमोजणी

**धाराशिव : स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या विधानपरिषद निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची मुदत संपल्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. उस्मानाबाद–लातूर–बीड आणि सोलापूरसह इतर मतदारसंघांतील लढती आता निश्चित झाल्या असून, राज्यातील अन्य जागांसह या मतदारसंघांसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. मतमोजणी २२ जून रोजी पार पडणार आहे.**





भारतीय जनता पक्षाने उस्मानाबाद–लातूर–बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून माजी मंत्री बसवराज पाटील यांना तर सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून माजी आमदार राजेंद्र राऊत यांना उमेदवारी दिली आहे. या दोन्ही उमेदवारांच्या निवडीमुळे संबंधित जिल्ह्यांतील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

उस्मानाबाद–लातूर–बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात भाजपचे बसवराज पाटील आणि काँग्रेसचे महेश देशमुख यांच्यात थेट सामना होणार आहे. अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी सातही अपक्ष उमेदवारांनी माघार घेतल्याने निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले.

या मतदारसंघात अपक्ष म्हणून अर्ज दाखल केलेले रिपाइंचे मिलिंद महालिंगे, भाजपच्या अर्चना गंगणे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांशी संबंधित काही उमेदवार तसेच उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेशी संबंधित नगरसेवक सचिन पवार आणि संजय मुंदडा यांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता ही निवडणूक थेट भाजप आणि काँग्रेस यांच्यात रंगणार आहे.

बसवराज पाटील यांनी काँग्रेसमधील गेल्या अनेक वर्षांची राजकीय कारकीर्द संपवत फेब्रुवारी २०२४ मध्ये भाजपमध्ये प्रवेश केला होता. लोकसभा निवडणुकीपूर्वी समर्थकांसह भाजपमध्ये दाखल झाल्यानंतर पक्षाने त्यांच्यावर लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली होती. संघटनात्मक पातळीवर काम करताना त्यांनी लातूर जिल्हा परिषदेत भाजपची सत्ता प्रस्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे मानले जाते.

दरम्यान, सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी राजेंद्र राऊत यांच्या नावाची घोषणा होताच त्यांच्या समर्थकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर प्रतिकूल राजकीय परिस्थितीचा सामना करावा लागलेल्या राऊत यांना पक्षाने पुन्हा एकदा महत्त्वाची संधी दिल्याचे मानले जात आहे. या मतदारसंघात महाविकास आघाडीकडून वसंतराव देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पक्ष संघटना विस्तार, निवडणूक व्यवस्थापन, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संपर्क तसेच नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भाजपला मिळालेले यश या पार्श्वभूमीवर पक्ष नेतृत्वाने राजेंद्र राऊत यांच्यावर विश्वास दाखविल्याची चर्चा आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, नगरपरिषद, जिल्हा परिषद तसेच विविध स्थानिक निवडणुकांमध्ये पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यात राऊत यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

## दिनेश बंडगर यांना राज्यस्तरीय ‘डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसी रत्न पुरस्कार’

**धाराशिव :** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल दिनेश दत्ता बंडगर यांना राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा ‘राज्यस्तरीय डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसी रत्न पुरस्कार – २०२६’ देऊन गौरविण्यात आले. महासंघाच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनात हा सन्मान प्रदान करण्यात आला.



पनवेल येथील व्ही. के. हायस्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात आणि राज्यस्तरीय अधिवेशनात राज्यभरातील शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कोकण विभागाचे माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी भूषविले, तर पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत आणि उम रगा–लोहारा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पुरस्कार प्रदान करताना उपस्थित मान्यवरांनी दिनेश बंडगर यांच्या समाजाभिमुख कार्याचा गौरव केला. विविध सामाजिक उपक्रमांमधून त्यांनी जपलेली सामाजिक बांधिलकी आणि सम ाजाच्या उन्नतीसाठी केलेले प्रयत्न प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

सन्मान स्वीकारल्यानंतर दिनेश बंडगर यांनी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे आभार मानले. हा पुरस्कार आपल्या कार्याची पावती असून भविष्यात अधिक जोमाने समाजसेवा करण्यासाठी प्रेरणा देणारा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

या अधिवेशनाला महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले, सरचिटणीस संतोष भोजने, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, महिला राज्याध्यक्ष रेखाताई सुळे, महिला सरचिटणीस विनया जाधव, राज्य संपर्कप्रमुख मंगेश सुवर्णकार, राज्य प्राध्यापक प्रमुख सुवर्ण पगार, राज्य खाजगी विभाग प्रमुख राजन पाटील, राज्य मनपा प्रमुख श्रीराम पळसकर, राज्य प्रवक्ते अर्जुन जाधव, राज्य प्रसिद्धी प्रमुख धनाजी घरत तसेच अनंत फ ुलसुंदर, दीपक हजारे, अशोक खडके, परमेश्वर साखरे, सतीश हुंडेकरी यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी उपस्थित होते.म हासंघाच्या पहिल्याच राज्यस्तरीय अधिवेशनात मिळालेला हा सन्मान दिनेश बंडगर यांच्या सामाजिक कार्याची महत्त्वपूर्ण दखल मानली जात असून त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

तेरणा वृत्तांत
# संपादकीय

## पर्यावरणाचा प्रश्न: उद्याच्या अस्तित्वाची लढाई

दरवर्षी ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्याची जाणीव निर्माण करणे आणि भावी पिढ्यांसाठी शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारण्याचा संकल्प करणे, हा या दिवसामागील प्रमुख उद्देश आहे. मात्र, पर्यावरण दिन साजरा करणे आणि प्रत्यक्षात पर्यावरणाचे रक्षण करणे यामध्ये मोठी दरी आहे. आज संपूर्ण जग हवामान बदल, जागतिक तापमानवाढ, अवकाळी पाऊस, दुष्काळ, पूर, वादळे आणि वाढत्या प्रदूषणाच्या गंभीर संकटांना सामोरे जात आहे. ही संकटे आता केवळ वैज्ञानिकांच्या अहवालांपुरती मर्यादित राहिलेली नाहीत, तर ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनली आहेत.

यंदाचा उन्हाळा हे त्याचे सर्वात ठळक उदाहरण म्हणावे लागेल. महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये तापमानाने विक्रमी उच्चांक गाठला. अनेक शहरांमध्ये पारा ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेला. ग्रामीण भागात पाण्याची टंचाई निर्माण झाली. उष्माघाताच्या घटनांमध्ये वाढ झाली. शेतकरी, मजूर, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागला. हा केवळ एका वर्षाचा अपवाद नाही; गेल्या काही वर्षांपासून उन्हाळ्याची तीव्रता सातत्याने वाढताना दिसत आहे. वैज्ञानिकांच्या मते, यामागे जागतिक तापमानवाढ हेच प्रमुख कारण आहे.

जागतिक तापमानवाढ म्हणजे पृथ्वीच्या सरासरी तापमानात होत असलेली सातत्यपूर्ण वाढ. औद्योगिकीकरणानंतर वातावरणात कार्बन डायऑक्साइड, मिथेन आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. वाहनांची संख्या, उद्योगधंदे, जंगलतोड, कोळसा आणि पेट्रोलियम इंधनांचा वाढता वापर यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध अहवालांमध्ये वारंवार इशारा देण्यात आला आहे की, जर तापमानवाढीवर नियंत्रण मिळवले नाही, तर पुढील काही दशकांत जगाला अभूतपूर्व पर्यावरणीय संकटांचा सामना करावा लागू शकतो.

हवामान बदलाचे सर्वाधिक गंभीर परिणाम कृषी क्षेत्रावर होत आहेत. भारतासारख्या कृषिप्रधान देशात पाऊस हा शेतीचा मुख्य आधार आहे. परंतु गेल्या काही वर्षांत पावसाचे चक्र मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले आहे. पूर्वी ठराविक काळात आणि ठराविक प्रमाणात पडणारा पाऊस आता अनियमित झाला आहे. कधी अतिवृष्टी तर कधी दीर्घकाळ दुष्काळ अशी परिस्थिती निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ आणि इतर भागांमध्ये अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

अवकाळी पाऊस ही आता अपवादात्मक घटना राहिलेली नाही. रब्बी हंगामातील पिके काढणीला आली असताना अचानक पाऊस आणि गारपिटीमुळे पिकांचे नुकसान होते. फळबागा उद्ध्वस्त होतात. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. हवामानातील ही अनिश्चितता शेतीच्या अर्थकारणालाच हादरा देत आहे. शेतकरी कोणते पीक घ्यावे, पेरणी कधी करावी किंवा काढणी कधी करावी याबाबत संभ्रमात आहेत. हवामान बदलाचे परिणाम सर्वप्रथम आणि सर्वाधिक शेतकऱ्यांनाच भोगावे लागत आहेत.

शहरी भागही या संकटापासून अलिप्त नाहीत. वाढते नागरीकरण, काँक्रीटची जंगले, कमी होत जाणारी झाडे आणि जलस्रोतांचे अतिक्रमण यामुळे शहरांचे नैसर्गिक संतुलन बिघडले आहे. परिणामी शहरांचे तापमान आसपासच्या ग्रामीण भागापेक्षा अधिक राहते. दुसरीकडे, थोड्याशा पावसातही शहरांमध्ये पाणी साचते, कारण नैसर्गिक नाले आणि जलवाहिन्यांचे अस्तित्व नष्ट होत चालले आहे.

पर्यावरणाचा प्रश्न हा केवळ तापमानवाढीपुरता मर्यादित नाही. वायू प्रदूषण, जलप्रदूषण, प्लास्टिक कचरा, जैवविविधतेचा ऱ्हास आणि जंगलतोड यांसारखी अनेक आव्हाने आपल्यासमोर उभी आहेत. विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड केली जाते. नवीन रस्ते, इमारती आणि औद्योगिक प्रकल्प उभे राहत असताना पर्यावरणीय परिणामांचा अनेकदा पुरेसा विचार केला जात नाही. परिणामी नैसर्गिक अधिवास नष्ट होतात आणि अनेक वनस्पती व प्राणी प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

पर्यावरण संवर्धनासाठी शासन, उद्योग आणि नागरिक या तिन्ही घटकांची समान जबाबदारी आहे. शासनाने पर्यावरणपूरक धोरणे आखणे, प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर उपाययोजना करणे आणि नवीकरणीय ऊर्जेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि हरित तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. उद्योगांनीही पर्यावरणीय जबाबदारी स्वीकारून कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

मात्र, केवळ शासन आणि उद्योगांकडून अपेक्षा ठेवून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाची भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. पाणी वाचवणे, वीजेचा अपव्यय टाळणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, झाडे लावणे आणि त्यांचे संगोपन करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे यांसारख्या छोट्या कृतींचा मोठा परिणाम होऊ शकतो. पर्यावरण संरक्षण ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून ती जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे.


विशेषतः तरुण पिढीमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी पर्यावरण शिक्षणाला अधिक प्राधान्य दिले पाहिजे. केवळ वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करून जबाबदारी संपत नाही. लावलेल्या झाडांचे संगोपन, जलसंधारण, कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधतेचे संरक्षण यांसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत.

भारतीय संस्कृतीत निसर्गाला देवतासमान स्थान दिले गेले आहे. नद्या, पर्वत, वृक्ष आणि वन्यजीव यांच्याबद्दल आदराची भावना आपल्या परंपरेत आहे. मात्र आधुनिक जीवनशैलीच्या धावपळीत आपण निसर्गाशी असलेले नाते विसरत चाललो आहोत. पर्यावरणाचे नुकसान म्हणजे शेवटी स्वतःच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करणे होय.

जागतिक पर्यावरण दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम किंवा घोषणांचा दिवस नाही. तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. यंदाचा कडक उन्हाळा, वारंवार होणारा अवकाळी पाऊस, वाढते तापमान आणि बदलते हवामान यांमधून निसर्ग आपल्याला स्पष्ट इशारा देत आहे. हा इशारा वेळीच समजून घेतला नाही, तर भविष्यातील संकटे अधिक गंभीर असतील. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नसून समतोल असला पाहिजे. आर्थिक प्रगतीसोबत पर्यावरणीय जबाबदारी स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

# तुळजापूरात पोलिसांची धडक कारवाई

## २ मटका अड्डे, २ अवैध ताडी केंद्रांवर छापे, १४ जण ताब्यात



**तुळजापूर : धाराशिव जिल्ह्यातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाने धडक कारवाई सुरू ठेवली असून, तुळजापूर शहरात गुरुवारी (दि. ४ जून) एकाच वेळी पाच ठिकाणी छापेमारी करण्यात आली. या कारवाईत दोन मटका अड्डे, दोन अवैध ताडी विक्री केंद्रे आणि कोपटा (COTPA) कायद्यांतर्गत एका ठिकाणावर कारवाई करण्यात आली. यामध्ये १४ संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून दोन आरोपी फरार झाले आहेत.**

पोलीस अधीक्षक श्रीमती रीतु खोखर व अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मोहिते यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे आखलेल्या या मोहिमेत सहायक पोलीस निरीक्षक श्री. सुरेश कासुळे, सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रविण सोमवंशी, पोलीस उपनिरीक्षक श्री. रामचंद्र बहुरे यांच्यासह क्यूआरटी (QRT) व आरसीपी (RCP) पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

छापेमारीदरम्यान पोलिसांनी मटका अड्डे आणि अवैध ताडी विक्री केंद्रांवर कारवाई करून १४ संशयितांना ताब्यात घेतले. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ च्या कलम १२ (अ), महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५-इ व ८४ तसेच कोपटा (COTPA) कायद्यानुसार एकूण पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कारवाईदरम्यान घटनास्थळावरून सुमारे १३० लिटर अवैध ताडी जप्त करत पोलिसांनी नष्ट केली. फरार आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

धाराशिव जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे, जुगार अड्डे किंवा अवैध दारू-ताडी विक्री खपवून घेतली जाणार नसून, अशा व्यवसायांविरोधात यापुढेही कठोर कायदेशीर कारवाई सुरू राहील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.



## कामाचे आमिष दाखवून तरुणीवर लैंगिक अत्याचार

**नळदुर्ग :** कायमस्वरूपी काम देण्याचे आमिष दाखवून एका २२ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित घटना ३१ मे २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. आरोपीने पीडित तरुणीला कायमस्वरूपी काम मिळवून देण्याचे आश्वासन देत मोटारसायकलवर बसवून अंधारात एका निर्जन जागी नेले. तेथे धमकी देत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.

घटनेनंतर आरोपीने कोणालाही याबाबत माहिती देऊ नकोस, तसेच मी तुझा कायम सांभाळ करीन, असे सांगून पिडीत तरुणीला रस्त्यावर सोडून तेथून पळ काढला, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

पीडितेने २ जून २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ६४ व ३५१(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नळदुर्ग पोलीस करीत आहेत.



### धाराशिव : प्रभाग क्रमांक ५ मध्ये स्वच्छता मोहीम

## रस्ते व नाल्यांची करण्यात आली सफाई

**धाराशिव :** शहरातील प्रभाग क्रमांक ५ अंतर्गत चंद्रभागा सोसायटी, रेल्वे स्टेशन रोड परिसरात स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेत परिसरातील रस्त्यांची तसेच नाल्यांची सफाई करण्यात आली.

परिसर स्वच्छ व निरोगी ठेवण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी नगरसेवक प्रवीण माळी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता कामे पार पडली. या प्रसंगी अतुल कावरे, योगेश दहिटणकर, शंकर हिंगमिरे, प्रदीप तांभारे, भास्कर पवार, दर्शन ठाकूर, नितीन येणेगुरे, अडसूळे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

स्थानिकनागरिकांनीपरिसरातील स्वच्छतेसाठी करण्यात आलेल्या या उपक्रमाचे स्वागत करत अशा मोहिमा नियमितपणे राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली. स्वच्छता राखणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून नागरिकांनीही परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## शैक्षणिक साहित्य वाटप करून डॉ. पद्मसिंह पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**धाराशिव :** धाराशिव : महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री, ज्येष्ठ नेते डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्वर्गीय डॉ. चंद्रकलादेवी पद्मसिंह पाटील ग्रंथालय व तेरणा स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्र, धाराशिव येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या शुभहस्ते स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि करिअर विकासासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास ग्रंथालय व अध्ययन केंद्राचे पदाधिकारी, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



## बोगस पुजारी व्यवसाय करणाऱ्या दोघांवर कारवाई

### श्री तुळजाभवानी मंदिर प्रशासनाचे विशेष पथक सक्रिय

**तुळजापूर : सध्या अधिक मास सुरू असून श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक तुळजापूर येथे येत आहेत. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता त्यांची कोणत्याही प्रकारे फसवणूक होऊ नये तसेच भाविकांची धार्मिक विधी व अधिकृत पुजाऱ्यांकडूनच पूजा व्हावी, यासाठी श्री तुळजाभवानी मंदिर प्रशासनाने अनधिकृत पूजारी व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विशेष पथक स्थापन केले आहे.**

शुक्रवारी सकाळी पथकाने केलेल्या पाहणीदरम्यान अमर वसंतराव शेळके व रवी दत्तात्रय शिरसाट या दोन व्यक्ती अनधिकृतपणे पुजारी व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले. संबंधित व्यक्ती मंदिरातील नियमांचे उल्लंघन करत असल्याचे तसेच त्यांच्या कृतीमुळे मंदिरातील शिस्त व व्यवस्थापनास बाधा निर्माण होत असल्याचे आढळून आले.

या प्रकरणाची नोंद घेऊन संबंधित व्यक्तींना पुढील कारवाई साठी तुळजापूर पोलिस स्टेशन येथे दाखल करण्यात आले आहे.

सदर पथकात सहायक व्यवस्थापक (धार्मिक), सुरक्षा निरीक्षक, SISPL Pvt. Ltd. चे सुरक्षा पर्यवेक्षक तसेच मंदिर संस्थानचे दोन शिपाई यांचा समावेश आहे. हे पथक मंदिर परिसरात नियमितपणे पाहणी करून अनधिकृत पूजारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींवर लक्ष ठेवत आहे.

## 'एमएसएमई'ची हेल्पलाईन सुरू; उद्योजकांना तज्ज्ञ मार्गदर्शन

**मुंबई :** राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSME) व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन, माहिती आणि तज्ज्ञ सल्ला सहज उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र RAMP (Raising and Accelerating MSME Performance) कार्यक्रमांतर्गत चडचए हेल्पलाईनची सुरूवात करण्यात आली आहे. या हेल्पलाईनद्वारे राज्यभरातील उद्योजकांना पूर्णतः मोफत मार्गदर्शन व सल्ला उपलब्ध करून दिला जाणार आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय (MoMSME), भारत सरकार आणि जागतिक बँक यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या RAMP कार्यक्रमाअंतर्गत हा उपक्रम महाराष्ट्रात महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (MSSIDC) मार्फत कार्यान्वित करण्यात आला आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर (MCCIA) यांच्या माध्यमातून ही हेल्पलाईन सेवा उपलब्ध करण्यात आली आहे.

राज्यातील कोणत्याही भागातील उद्योजक +९१८३०८८०९३३४ या क्रमांकावर कॉल किंवा Whatsapp करून या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. उद्योग क्षेत्रातील विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती, वित्तीय सल्ला, बाजारपेठ उपलब्धता तसेच व्यवसाय विकासासाठी आवश्यक सहाय्य या माध्यमातून मिळणार आहे.

## 'माझी वसुंधरा' अभियानातून स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**धाराशिव :** नगर परिषद धाराशिवच्या वतीने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) आणि 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत शहरात स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत शहरातील विविध ठिकाणी जनजागृतीपर फलक उभारून नागरिकांना स्वच्छता राखण्याचे तसेच पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले.



या फलकांद्वारे ओला व सुका कचरा वेगळा संकलित करण्याचे महत्त्व, प्लास्टिकचा वापर कमी करण्याची आवश्यकता, वृक्षारोपणाचे फायदे आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. तसेच 'स्वच्छ धाराशिव, सुंदर धाराशिव' ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नगर परिषद प्रशासनाने केले आहे.

या अभियानामुळे शहर अधिक स्वच्छ, हरित आणि पर्यावरणपूरक बनण्यास मदत होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. स्वच्छता ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असून त्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असेही यावेळी सांगण्यात आले.

या प्रसंगी नगराध्यक्षा नेहा काकडे, मुख्याधिकारी अंधारे मॅडम, गोरे साहेब, नगरसेवक राहुल काकडे, अभिजित काकडे, आकाश तावडे, बापू पवार, अमित उंबरे, अक्षय जोगदंड, दत्ता पेठे यांच्यासह नगर परिषद कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

साप्ताहिक तेरणा वृत्तांत
हे पत्र मालक, प्रकाशक व संपादक मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांचे करिता प्रसाद संजय पवार, राजस्व प्रिंटिंग प्रेस, बुधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर, जि.सोलापूर ४१३००२ येथे मुद्रित केले व नरसिंह मंदिराजवळ, तेर, धाराशिव, महाराष्ट्र – ४१३५०९ येथे प्रकाशित केले. संपर्कासाठी : मो. ९९७५६५०३६३, इमेल – ternavruttant@gmail.com

Printed by Prasad Sanjay Pawar at Rajswa Printing Press, Budhwar Peth, Wadar Galli, Solapur, Dist. Solapur 413002, for the owner, publisher and editor Malhar Ranajagjitsingh Patil, published at Ter, near Narsingh Temple, Dharashiv, Maharashtra – 413509. RNI No. – MHMAR/25/A0338.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप

## गेट, इनोव्हेशन व इंटर्नशिपमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**धाराशिव : येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र व अभियांत्रिकी विभागात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी भावपूर्ण निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रम ात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतानाच गेट परीक्षा, इनोव्हेशन आणि विविध इंटर्नशिपमध्ये उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात अंतिम वर्षाचा विद्यार्थी जगदीश सुतार याच्या सुमधुर बासरीवादनाने झाली. त्यानंतर शेख नयूम, अल्सफा अरब, जगदीश सुतार आणि अभिजित माने यांनी महाविद्यालयातील चार वर्षांच्या प्रवासातील विविध स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रम आणि अविस्म रणीय आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या मनोगतांमुळे उपस्थित वातावरण भावूक झाले.

यावेळी विभागप्रमुख प्रा. सुजाता गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, ङ्कसतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत स्वतःला अद्ययावत ठेवले, तर उद्याचे जग तुमचेच असेल,ङ्ख असा संदेश दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सांगितले की, संगणक शास्त्र व अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी सातत्याने नवीन तंत्रज्ञान आत्मसात करत आहेत. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली असून, हे विद्यार्थी भविष्यात निश्चितच मोठी भरारी घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विभागातील वरिष्ठ प्राध्यापक प्रा. डी. बी. भक्ते यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. बी. फार्मसी विभागप्रमुख डॉ. प्रीती माने यांनी विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण कल्पनांच्या माध्यमातून शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी उपयुक्त सॉफ्टवेअर विकसित करण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी गेट परीक्षेत यश मि ळवलेल्या शेख समीर, इनोव्हेशन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उत्कर्ष म्हात्रे तसेच विविध इंटर्नशिप यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख समीर यांनी केले.

कार्यक्रमाला संगणक शास्त्र व अभियांत्रिकी विभागातील डॉ. होळंबे, प्रा. भक्ते, प्रा. वाकुरे, प्रा. बोंडगे, प्रा. पाटील तसेच श्री. वडगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तृतीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.




## ‘आम्ही डिपार्टमेंटचे आहोत’ म्हणत ज्येष्ठ महिलेची फसवणूक; ४ तोळे सोन्याच्या

**बार्शी : शहरात बनावट पोलिस असल्याचे भासवून एका ६५ वर्षीय ज्येष्ठ महिलेची फसवणूक करत चार तोळे वजनाच्या सोन्याच्या पाटल्या लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी चार अनोळखी भामट्यांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.**

> नागरिकांनी कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर सहज विश्वास ठेवू नये. कोणीही संशयास्पद व्यक्ती चुकीची माहिती देत असेल किंवा बोलण्यात गुंतवून फसवण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करून तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज आहे.
>
> **– पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे,**
> बार्शी शहर पोलीस ठाणे

याबाबत सुमन विलास चौधरी (वय ६५, रा. भोगेश्वरी चाळ, बार्शी) यांनी फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार (दि. १ जून) रोजी सकाळी सुम ारे ११ वाजण्याच्या सुमारास सुमन चौधरी या भोगेश्वरी मंदिरातून घरी परतत होत्या. शेंडगे हार्डवेअर दुकानाजवळ एका अनोळखी युवकाने त्यांना थांबवत समोरील बोळात उभ्या असलेल्या तीन व्यक्तींना भेटण्यास सांगितले.

संबंधित व्यक्तींनी स्वतःची ओळख ’डिपार्टमेंटचे लोक’ अशी करून दिली. तसेच परिसरातील एका सोनाराचा खून झाल्याचा बनाव रचत तपास सुरू असल्याचे सांगितले. याचवेळी हातात सोन्याचे दागिने घालून फिरणे धोकादायक असल्याचे सांगून त्यांनी महिलेचा विश्वास संपादन केला.

भामट्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून सुमन चौधरी यांनी हातातील चार तोळे वजनाच्या सोन्याच्या पाटल्या काढून दिल्या. आरोपींनी त्या कागदात गुंडाळून परत दिल्या. मात्र घरी गेल्यानंतर कागद उघडून पाहिले असता त्यामध्ये सोन्याच्या पाटल्यांऐवजी काचेच्या तीन बांगड्या आढळून आल्या. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी कुटुंबीयांना माहिती देऊन बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या घटनेत चार तोळे वजनाच्या सोन्याच्या पाटल्या लंपास झाल्याची नोंद फिर्यादीत करण्यात आली आहे. दरम्यान, स्वतःला पोलीस, सरकारी अधिकारी किंवा तपास यंत्रणेचे कर्मचारी म्हणून ओळख सांगणाऱ्या अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, तसेच कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बार्शी शहर पोलीस करीत आहेत.

# कोयत्याच्या जोरावर दहशत माजवणाऱ्या सराईत गावगुंडाला अटक



ओंकार हिंगमिरे
बार्शी प्रतिनिधी

**बार्शी : शहर व तालुका परिसरात कोयत्याच्या सहाय्याने दहशत निर्माण करून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, व्यावसायिक आणि शासकीय कर्मचाऱ्यांना त्रास देणाऱ्या सराईत गावगुंडाला बार्शी तालुका पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद केले आहे. संजय विलास आरगडे (रा. तावडी, ता. बार्शी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याविरुद्ध यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.**




पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संजय आरगडे व त्याच्या साथीदारांविरुद्ध जमीन-जुमला बळकावणे, गरीब शेतकरी व व्यावसायिकांना म ारहाण करून दहशत निर्माण करणे, शासकीय कर्मचाऱ्यांना धमकावणे, शासकीय कामकाजात हस्तक्षेप करणे तसेच नागरिकांना जबर मारहाण करून भयाचे वातावरण निर्माण केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १७१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९, ११९, ११८(१), ३५२, ३५१(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवत आरोपीचा शोध सुरू केला. दरम्यान, संजय आरगडे हा पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. विशेष म्हणजे, आरोपीविरुद्ध यापूर्वी विविध गंभीर स्वरूपाचे तब्बल १० गुन्हे दाखल असून त्याला पूर्वी तडीपारही करण्यात आले होते.

### पळून जाण्याच्या तयारीत असतानाच बार्शी तालुका पोलिसांची धडक कारवाई

सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी जिल्ह्यात दहशत माजविणारे, म हिलांना त्रास देणारे, अवैध सावकारी करणारे तसेच बेकायदेशीर व्यवसाय चालविणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, सहायक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत घोळवे व त्यांच्या पथकाने पार पाडली. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, आरोपी किंवा त्याच्या साथीदारांकडून यापूर्वी कोणाला त्रास झाला असेल अथवा त्यांच्याविरुद्ध कोणतीही तक्रार असल्यास न घाबरता बार्शी तालुका पोलीस ठाण्यात संपर्क करावा! ओळख गोपनीय ठेवली जाईल.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ‘आपलं हरित धाराशिव’ फाउंडेशनतर्फे वृक्षारोपण

**धाराशिव : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धन आणि शहरातील हरित क्षेत्र वाढविण्याच्या उद्देशाने ‘आपलं हरित धाराशिव’ फाउंडेशनच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. शहर अधिक हिरवेगार आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजभाऊ पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगर परिषदेच्या नगराध्यक्षा नेहाताई राहुल काकडे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा बाजार समितीचे संचालक उमेशराजे निंबाळकर, बाजार समितीचे उपसभापती शेषराव चव्हाण, नगर परिषदेचे बांधकाम सभापती अभिजीत काकडे, पाणीपुरवठा समितीचे सभापती विलास लोंढे, नगरसेवक राहुल काकडे, बापू पवार, नरसिंह मेटकर, सुनील आंबेकर तसेच ज्येष्ठ पत्रकार अभिमान हगरगेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्ष लागवडीचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ वृक्षारोपण करून थांबणे पुरेसे नसून त्यांचे संगोपन आणि संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. वाढते तापमान, प्रदूषण आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेता अशा उपक्रमांची आज अधिक गरज असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ‘आपलं हरित धाराशिव’ फाउंडेशनचे अध्यक्ष सुमित बागल, सचिव प्रमोद हुग्गे, कार्याध्यक्ष अमरसिंह गोरे तसेच सदस्य महेश उंबरे आणि धीरज मोटे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन भालचंद्र कोकाटे यांनी केले.




# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात ‘विभागीय सुसंवाद-२०२६’ उत्साहात

## प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थी-पालकांना सविस्तर मार्गदर्शन

**धाराशिव : महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल), मुंबई आणि तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने ‘विभागीय सुसंवाद-२०२६’ या विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अभियांत्रिकी, वैद्यकीय तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित या कार्यक्रम ाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून सीईटी सेलचे श्री. नानासाहेब फटांगरे (ग्रुप ए), सिद्धेश्वर नर (वैद्यकीय प्रवेश), कुणाल देवकर (तांत्रिक प्रवेश), शार्दुल कदम (फाईन आर्ट), प्रमोद झरकर, तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने तसेच इव्हेंट मॅनेजर प्रशांत गजरकर उपस्थित होते.

विद्यार्थी व पालकांना प्रवेश प्रक्रियेची सखोल माहिती मिळावी यासाठी महाविद्यालयात सेमिनार हॉलसह तीन स्वतंत्र कक्षांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकलेल्या विद्यार्थी-पालकांसाठी युट्यूबच्या माध्यमातून कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले.

मार्गदर्शन करताना श्री. नानासाहेब फटांगरे यांनी अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेतील विविध टप्पे, तीन प्रवेश फेऱ्या, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज भरण्याची पद्धत याविषयी सविस्तर माहिती दिली. राज्यभरात कार्यरत असलेल्या विद्यार्थी सहाय्यता केंद्रांचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.




वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करताना सिद्धेश्वर नर यांनी अर्ज भरताना अत्यंत दक्षता घेण्याचा सल्ला दिला. अर्जातील किरकोळ चुका किंवा पर्याय निवडताना होणाऱ्या त्रुटींमुळे विद्यार्थ्यांना शासकीय महाविद्यालयाऐवजी खासगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळण्याची शक्यता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कुणाल देवकर, शार्दुल कदम आणि प्रमोद झरकर यांनी अभियांत्रिकी, वैद्यकीय, कला आणि इतर उच्च शिक्षण शाखांमधील करिअरच्या संधी तसेच प्रवेश प्रक्रियेतील महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन केले. यावेळी परसेंटेज आणि परसेंटाइलमधील फरक, लेटरल एन्ट्री, वर्किंग प्रोफ ेशन सुविधा तसेच महाविद्यालयांच्या नामसाधर्म्यामुळे चॉईस कोड निवडताना होणाऱ्या संभाव्य अडचणींबाबत विद्यार्थ्यांना विशेष माहिती देण्यात आली.

सीईटी सेल, मुंबईच्या वतीने तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरू असलेल्या एक्स्टेन्शन सेंटर आणि एफसी सेंटरचा लाभ घेण्याचे आवाहनही मार्गदर्शकांनी केले.

प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थी आणि पालकांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी तसेच जिल्हाभरातील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मार्गदर्शनपर सत्रामुळे प्रवेश प्रक्रियेबाबत स्पष्टता मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सीईटी सेल, मुंबई यांनी तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कौतुक केले.

# प्रतिबंधित पान मसाला, गुटखा, भेसळयुक्त अन्नपदार्थांचा १ कोटी ५८ लाख २८ हजार रुपयांचा साठा जप्त

## अन्न व औषध प्रशासनाच्या राज्यव्यापी मोहीम

**मुंबई : राज्यातील प्रतिबंधित पान मसाला,गुटखा, भेसळ अन्नपदार्थाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर सात दिवस धडक मोहीम राबवत २५ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत एकूण १ कोटी ५८ लाख २८ हजार ६७७ रुपयांचा साठा जप्त केला असून १०२ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. एकूण २०३ आस्थापनांवर कारवाई केली. तसेच ८६ आस्थापना सील करण्यात आल्या आहेत.**



यामध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या कलम २६, २७, ३०(२)(अ) आणि ५९ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत ३४ लाख ५ हजार ४८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### प्रतिबंधित गुटखा–पानमसाल्याविरोधात कारवाई

आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार राज्यभर प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक व विक्रीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत १३० आस्थापनांवर छापे टाकण्यात आले.

| | |
|---|---|
| कोकण विभाग | ४७ कारवाया, ४६ व्यक्तींना अटक |
| बृहन्मुंबई | २२ कारवाया, २३ व्यक्तींना अटक |
| पुणे विभाग | १४ कारवाया, १३ व्यक्तींना अटक |
| नाशिक विभाग | ५ कारवाया, ५ व्यक्तींना अटक |
| छत्रपती संभाजीनगर विभाग | ८ कारवाया, ८ व्यक्तींना अटक |
| अमरावती विभाग | ५ कारवाया, ५ व्यक्तींना अटक |
| नागपूर विभाग | २ कारवाया, २ व्यक्तींना अटक |

या मोहिमेत ७३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये आंबे, बुंदी लाडू, खवा, बेकरी पदार्थ, कँडी, दूध व दुग्धजन्य पदार्थ, गूळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईस्क्रीम, कुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाले, शेंगदाणा चिक्की तसेच भेसळीसाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांचा समावेश होता. या कारवाईत १ कोटी २४ लाख २३ हजार ६२९ रुपये किमतीचा आणि सुमारे ९०,६३९ किलो वजनाचा संशयित निकृष्ट व असुरक्षित अन्नसाठा जप्त करण्यात आला. संबंधित अन्न नमुने पुढील विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

### भेसळयुक्त व निकृष्ट अन्नपदार्थांवरही कारवाई

अन्न व औषध प्रशासनाच्या 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' या संकल्पनेअंतर्गत राज्यभर भेसळ, अस्वच्छ अन्न उत्पादक आणि नियमभंग करणाऱ्या अन्न व्यवसायिकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, भंडारा, जालना, बीड, नांदेड, परभणी, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, जळगाव, रायगड, धुळे आदी जिल्ह्यांमध्ये अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर तपासण्या केल्या.

नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्न मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. भेसळ, निकृष्ट दर्जाचे अन्न किंवा प्रतिबंधित पदार्थांचे उत्पादन व विक्री आढळल्यास यापुढे आणखी कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

# ३०० कोटी वृक्षलागवड अभियानातून महाराष्ट्र हरित आणि पर्यावरणदृष्ट्या सक्षम होईल : वनमंत्री गणेश नाईक

**मुंबई :** पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'एक पेड मां के नाम' या अभियानातून देशभरात वृक्षारोपणाची लोकचळवळ उभी राहिली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील राज्यव्यापी ३०० कोटी वृक्षलागवड अभियानातून महाराष्ट्र हरित आणि पर्यावरणदृष्ट्या अधिक सक्षम होईल, असा विश्वास वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला.




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात केंद्रीय कर्मचारी निवासस्थान संकुलाचे भूमिपूजन आणि पर्यावरण जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष प्रचार वाहनाचे उद्घाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. गृह स्वयं पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा आमदार प्रवीण दरेकर, आमदार संजय उपाध्याय, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार मनीषा चौधरी, प्रभाग समिती अध्यक्ष प्रकाश दरेकर, गणेश शंकर, सरिता झोरे, अंकिता सावे, मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, मुख्य वनसंरक्षक (सीसीएफ) के. प्रदीपा, एन.आर. प्रवीण, वन विभागाच्या उपसचिव निकिता पांडे तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संचालिका अनिता पाटील उपस्थित होत्या.

नाईक म्हणाले की, ग्लोबल वॉर्मिंगमुळे पर्यावरण संरक्षणाची गरज सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली आहे. पारंपरिक पेट्रोल आणि डिझेल इंधनांना पर्याय म्हणून सौर आणि पवन ऊर्जे सारख्या पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोतांवर भर देण्याची आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र वेगाने प्रगती करत असून विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखण्याचे काम शासन करत आहे.

# धाराशिवमध्ये स्पा सेंटरवर छापा; पाच महिलांची सुटका

**धाराशिव :** शहरातील एका स्पा सेंटरमध्ये सुरू असलेल्या अनैतिक देहव्यापारावर पोलिसांनी धडक कारवाई करत पाच महिलांची सुटका केली आहे. या प्रकरणी संबंधित व्यवस्थापक, चालक व इतर आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक श्रीमती रीतू खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी शहरातील 'ऑरा (Aura) स्पा सेंटर'वर छापा टाकला.

पोलिसांनी प्रथम पंटरच्या माध्यमातून खात्री करून घेतली. त्यानंतर शासकीय पंचांच्या उपस्थितीत छापा टाकून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. कारवाईदरम्यान स्पा सेंटरमध्ये व्यावसायिक लैंगिक शोषण व अनैतिक व्यापार सुरू असल्याचे उघड झाले.

या प्रकरणी अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (PITA) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. कारवाईत पाच महिलांची सुटका करण्यात आली असून त्यांना पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले आहे.

या कारवाईत पोलीस निरीक्षक एम. एन. शेळके (AHTU), पोलीस उपनिरीक्षक सोनटक्के, पोलीस अंमलदार माने, दूधभाते, कंदळे, नाईकवडी, किवंडे, केवके तसेच महिला पोलीस हवालदार पुरी, जाधव आणि चालक यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून तिची जबाबदारी पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. बेकायदेशीर व अनैतिक कृत्यांवर कडक पाळत ठेवून तात्काळ कारवाई करण्यात येणार असून ही मोहीम यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.



# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे वृक्षारोपण व निसर्ग संवर्धनाचा संदेश

**धाराशिव : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद यांच्या वतीने ५ जून, २०२६ रोजी न्यायिक अधिकारी निवासस्थान परिसर, धाराशिव येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.**

दरवर्षी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत विविध सामाजिक व पर्यावरणपूरक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. याच परंपरेला अनुसरून या वर्षीही भव्य वृक्षारोपण मोहीम राबवून विविध झाडे लावण्यात आली. तसेच उपस्थितांना व नागरिकांना मानवी जीवनातील झाडांचे महत्त्व आणि निसर्ग संवर्धनाची गरज याविषयी सविस्तर माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांच्या हस्ते रोपटे लावून करण्यात आली. या प्रसंगी श्री.ए.एस.आवटे, जिल्हा न्यायाधीश श्री.आर.के.खोमणे, जिल्हा न्यायाधीश श्री.एन.एल.येवलेकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश उस्मानाबाद श्री.विश्वास करे, विभागीय वन अधिकारी, धाराशिव श्रीमती.भाग्यश्री पाटील, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद श्री.दिपक गांधले, वन परीक्षेत्र अधिकारी, धाराशिव, श्रीमती पी.व्ही.मेढे, मुख्य न्यायदंडाधिकारी, उस्मानाबाद, श्री.एस.एस.पाटील, सहदिवाणी न्यायाधीश व वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद तसेच श्री.एस.एस. पाटील, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, उस्मानाबाद यांची प्रमुख उपस्थिती होती.

वृक्षारोपण कार्यक्रमात जिल्हा न्यायालयातील कर्मचारी, विद्युत आणि वन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी मिळून पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली तसेच लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचा संकल्प केला.

# एसटी स्थानके व बसेसची दर चार तासांनी स्वच्छता : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यव्यापी अत्याधुनिक स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ मुंबईतील परळ बसस्थानक येथे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमामुळे राज्यातील बसस्थानके, एसटी बसेस, चालक–वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे अधिक स्वच्छ, सुंदर व प्रवासी–अनुकूल बनविण्याचा महामंडळाचा संकल्प असल्याचे मंत्री सरनाईक यांनी यावेळी सांगितले.**



परळ बसस्थानकातील या कार्यक्रमात स्वच्छता मोहिमेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक यंत्रसामग्रीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत राज्यभरातील प्रमुख बसस्थानके आणि त्यांचा परिसर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अत्याधुनिक स्वच्छता उपकरणांच्या सहाय्याने नियमितपणे स्वच्छ करण्यात येणार आहे. तसेच एसटी बसेस, चालक–वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे यांची दर चार तासांनी स्वच्छता करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून महाराष्ट्राच्या जनजीवनाचा अविभाज्य भाग आहे. दररोज लाखो प्रवासी एसटीच्या सेवांचा लाभ घेतात. त्यामुळे त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे ही महामंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने सुरू करण्यात आलेली ही राज्यव्यापी स्वच्छता मोहीम प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर, आनंददायी आणि समाधानकारक बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

### प्लास्टिक पिशव्या व बाटल्यांचे पुनर्वापरासाठी संकलन

पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्रत्येक बसस्थानकावर स्वच्छता मोहिमेदरम्यान आढळणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या व पिशव्या संकलित करून त्यांचे पुनर्वापर (रिसायकलिंग) करण्यासाठी पाठविण्यात येणार आहे. या प्रक्रियेतून विविध टिकाऊ व उपयुक्त उत्पादने तयार करण्यात येतील, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, स्वच्छता ही एकदिवसीय मोहीम नसून सातत्याने राबविण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे या मोहिमेच्या अंमलबजावणीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत नियमित देखरेख ठेवली जाणार असून स्वच्छतेच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रत्येक बसस्थानकावरील स्वच्छता व्यवस्थेचे नियोजनबद्ध निरीक्षण करण्यात येईल तसेच प्रवाशांकडून मिळणाऱ्या सूचना आणि अभिप्रायांनाही प्राधान्य दिले जाईल.